महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - २०

पनवेल महानगरपालिकेतील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१) १४ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका प्रशासनाने विविध संवर्गातील ३७७ पदांसाठी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान भरती प्रक्रिया राबविली असून उक्त भरती प्रक्रियेतील ३७७ पैकी २३८ कर्मचारी रुजू झाले असून अद्यापही ८१ पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिकेचा कारभार सुरळीत चालण्यासाठी रिक्त असलेली ८१ पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) : (१)अंशत: खरे आहे.

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत ४१ संवर्गातील ३७७ पदांकरीता डिसेंबर,२०२३ मध्ये घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणानुक्रम, प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन निवडसूची प्रतीक्षायादीसह प्रसिध्द करण्यात आली आहे.

निवडसूचीतील उमेदवारांची दस्तऐवज पडताळणी करण्यात येऊन २९१ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. सदरील कर्मचारी सेवेत रुजू झाले असून त्यापैकी ४७ कर्मचाऱ्यांचा राजीनामा स्विकृत झाला असल्याने आजमितीस २४४ कर्मचारी सेवेत कार्यरत असून १३३ पदे रिक्त आहेत.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०४/०५/२०२२ नुसार तयार करण्यात आलेल्या निवडसूचीत उमेदवार उपलब्ध होत नसल्याने आजमितीस १०२ पदे रिक्त ठेवावी लागत असून निवडसूची व्यपगत झाल्याने १३ पदे रिक्त ठेवावी लागत आहे व १८ पदांवर निवड प्रक्रिया सुरु आहे.

(२) पनवेल महानगरपालिका भरती प्रक्रिया अद्यापही सुरु असून सद्य:स्थितीत पात्र उमेदवारांना हजर करून घेण्याची प्रक्रिया चालू आहे.सदर प्रक्रिया पूर्ण होताच सर्व कार्यरत व रिक्त पदांचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पनवेल महानगरपालिकेचा थकीत असलेला मालमत्ता कर वसूल करण्याबाबत

(२) १७ (१६-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत आठ वर्षात ७० टक्के मालमत्ताधारकांनी पनवेल महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरल्याने पालिकेच्या लेखाशीर्षकात मालमत्ता धारकांची १८१० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०२४ अखेर किती थकीत मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकीत असल्याची कारणे काय आहेत व थकीत मालमत्ता कर वसुल करण्याच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने व शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी,२०२५ अखेर रक्कम रुपये १५४६.८८ कोटी थकबाकी आहे.

(२) माहे डिसेंबर,२०२४ अखेरपर्यंत थकीत मालमत्ता करापोटी रक्कम रुपये ३०३,३०,८१,११५/- वसूल करण्यात आली असून,उर्वरित मालमत्ता कर वसूल करणेची कार्यवाही सुरु आहे.

(३) अ) मालमत्ता कर थकीत असल्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत: १) महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट केलेल्या काही ग्रामपंचायतींचा महानगरपालिकेत समावेशनास नकार होता.त्यामुळे,सदर ठिकाणी असणारे मालमत्ता धारकांनी प्राथमिक सर्व्हेक्षणाचे वेळी कर आकारणी करणेस विरोध केलेला आहे.

२) अद्यापपर्यंत ग्रामीण भागातील बऱ्याच मालमत्ता धारकांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही. महानगरपालिका क्षेत्रात पूर्वीच्या सिडको क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याने व तेथील मालमत्ता धारक दिनांक ०१/१०/२०१६ पूर्वीपासून सिडकोला सेवाशुल्क देत असल्याने व महानगरपालिकेने मालमत्ता कराची आकारणी केल्याने दुबार कर आकारणी झाल्याच्या संभ्रमातून मालमत्ता कर भरणा करणेस इच्छुक नाहीत.

आ) महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर वसुली संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

१) मा.न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नसल्याने पनवेल महानगरपालिकेने फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये एकूण १३ पथके नियुक्त करुन जास्तीत जास्त मालमत्ता कर थकीत असलेल्या औद्योगिक आस्थापना / संस्था यांना जप्तीपूर्व अटकावणीची नोटीस देऊन त्यांना मालमत्ता कराचा भरणेबाबत प्रवृत्त करुन दिनांक ३१/०३/२०२५ अखेर रक्कम रुपये ४१३.४६/-कोटी इतक्या रक्कमेची वसुली केली आहे. त्यामध्ये, थकीत मालमत्ता कराची रक्कम रुपये २१,८८,२७,३५,८४२/- इतकी असून सन २०२४ – २०२५ च्या मागणी पैकी वसूल कराची रक्कम रुपये ४,१३,४६,९०,१९४/- इतकी आहे.

२) मालमत्ता करासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालय येथे २ याचिका प्रलंबित असून, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम निर्णयानुसार सन २०१६ ते मार्च २०२१ या कालावधीत शास्तीची रक्कम वगळता सन २०१६ पासूनचा संपूर्ण मालमत्ता कर भरणेबाबत न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नाही.तसेच, मा.उच्च न्यायालय येथे याचिका न्यायप्रविष्ट आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार

मालमत्ता कराच्या वसुली संदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत राज्यात १४ स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालय सुरू करणबाबत

(३) ९८ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत राज्यात १४ स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून या रुग्णालयाच्या माध्यमातून आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच योग, निसर्गोपचार आणि वृद्धापकाळातील उपचार देण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचा विस्तार राज्यातील सर्व जिल्ह्यात करून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक केंद्र सुरू करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर (३१-१०-२०२५) : (१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णांना आयुर्वेद, योग, युनानी, होमिओपॅथी या उपचार पध्दतींचा लाभ घेणेकरीता केंद्र शासन आयुष मंत्रालय मार्फत राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत स्वतंत्र १४ एकात्मिक आयुष रुग्णालयास मान्यता देण्यात आली आहे.
(२) राष्ट्रीय आयुष अभियाना अंतर्गत महाराष्ट्र राज्यात एकूण १४ एकात्मिक आयुष रुग्णालये मंजूर असून सद्य:स्थितीत राज्यात ३६१ आयुष सेवा देणाऱ्या संस्था (आयुष विंग) कार्यान्वित आहेत. तसेच सन २०२५-२६ च्या राज्य वार्षिक कृती आराखड्यामध्ये ५० खाटांचे ६ व ३० खाटांचे ७ असे एकूण १३ एकात्मिक आयुष रुग्णालयांचे प्रस्ताव मंजूरीकरीता आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर केले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पनवेल येथील कामोठे व तळोजा येथे महानगरपालिका शाळा सुरू करण्याबाबत

(४) १०३३ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथील कामोठे येथे दोन ठिकाणी व तळोजा येथे एका ठिकाणी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) वसाहतीत महानगरपालिका प्रशासन प्राथमिक शाळा उभारणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत अनेक वर्षांपासून येथील पालकांकडून पालिकेच्या शाळा सुरु करण्याची मागणी होत असून सदर मागणीनुसार पुढील दोन वर्षात या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश सुरु करण्याचे नियोजन पालिका आयुक्त यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा, कळंबोली, कामोठे, खारघर, नावडे या वसाहतींमध्ये महानगरपालिकेच्या स्वत:च्या शाळा नसून महानगरपालिकेने स्वत:च्या शाळा बांधण्याचे धोरण आखले असल्यामुळे सिडको वसाहतींमध्ये राहणाऱ्यांना अद्याप पालिकेकडून शिक्षण मिळत नसून पालकांना आर्थिक भार स्वीकारुन पाल्यांना खाजगी शाळेत शिकवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तळोजा, कामोठे येथील सिडको वसाहतीत महानगरपालिका प्रशासनाने प्राथमिक शाळा तात्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१२-०८-२०२५) : (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) तळोजा, कळंबोली, कामोठे, खारघर, नावडे या वसाहती नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या आहेत. त्या परिसरात पूर्वीच्या जिल्हा परिषदेच्या शाळा अस्तित्त्वात असून त्या ठिकाणी सदर परिसरातील विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत.तसेच,खाजगी अनुदानित शाळा देखील सदर वसाहतीच्या ठिकाणी आहेत.सदर शाळांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.
(४) तळोजे व कामोठे येथील आरक्षित भूखंड सिडको प्राधिकरणामार्फत हस्तांतरित झालेले आहेत.सदरच्या ठिकाणाचे शाळा बांधण्याचे आराखडे व नकाशे मनपाकडून तयार करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अनेक गावात रस्ते खराब असल्याने ज्या गावात चांगले रस्ते नाहीत त्या गावातील बससेवा बंद करण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

(५) २३३४ (१५-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक ग्रामपंचायतीना गावातील रस्ते सुधारावेत, खड्डे मुक्त करावेत म्हणून वारंवार सूचना देऊनही त्यात सुधारणा होत नसल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने ज्या गावात चांगला रस्ता नाही त्या गावात एस. टी. बस सेवा न देण्याचा निर्णय घेतल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील गावोगावी खड्डेमय प्रवास करावा लागत असल्याने एस.टी. चे होत असलेले मोठे नुकसान तसेच अपघाताची भीती यादृष्टीने घेण्यात आलेला हा निर्णय योग्य असून खड्डेमय असलेले रस्ते दुरुस्त करण्याकरीता ग्रामविकास विभागाकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती गावात असे खड्डेमय रस्ते दुरुस्ती करून एस.टी.ची सेवा पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते नादुरुस्त असल्याच्या कारणास्तव कोणत्याही मार्गावरील बससेवा बंद करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने

घेतलेला नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशीर्ष ३०५४-२४१९), जिल्हा वार्षिक योजना (३०५४/५०५४), प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, आदिवासी उपयोजना, बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, इ. योजनांतर्गत शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर निधीमधून ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती/दर्जोन्नती करुन रस्ते वाहतुकीस योग्य स्थितीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे शासन सेवेत समायोजन करणेबाबत

(६) २४२९ (१०-०७-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते सामान्य रुग्णालयापर्यंत आरोग्य सेवा देणारे ३४,००० कर्मचारी कार्यरत असून सदर योजनेसाठी केंद्राचा ६० टक्के तर राज्याचा ४० टक्के निधी उपलब्ध केला जात असून सदर कर्मचारी सेवेत कायम असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या ५० टक्के वेतनावर मागील १० वर्षापासून काम करत आहेत शिवाय मागील चार महिन्यापासून त्यांना वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) च्या सेवेत १० वर्ष पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे कायमस्वरुपी सेवेत समायोजन करणेसाठी शासनाने माहे जानेवारी, २०२४ मध्ये निर्णय घेतला असून परंतु फक्त ४५० कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले असल्याने उर्वरित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे तात्काळ समायोजन करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत १० वर्ष सेवा झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे तात्काळ समायोजन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर (३१-१०-२०२५) : (१) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन हे नियमित कमर्चाऱ्यांच्या वेतनापेक्षा कमी असते ही वस्तुस्थिती आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०२५ अखेरपर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

(२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे समावेशन करण्यासाठी आरोग्य विभागातील मंजूर समकक्ष पदाचे सेवाप्रवेश नियम सुधारित करुन त्यामध्ये सरळसेवेने ७० टक्के व दरवर्षी समावेशनाने ३० टक्के याप्रमाणे भरती करण्याबाबत दिनांक १४ मार्च, २०२४ चा शासन निर्णय घेण्यात आला आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत कार्यरत ३१ कंत्राटी वाहन चालकाच्या समावेशनाबाबत शासन आदेश दिनांक ०४/१२/२०२४ निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०२/०१/२०२५ च्या शासन आदेशान्वये ३४४, सपोर्ट स्टाफ (गट-ड) यांचे समायोजनाचे नियमित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले

आहेत. तसेच उर्वरीत संवर्गाचे नियमित सेवेत समावेशन करण्याबाबत सर्व संबंधित विभागांशी चर्चा करून उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत पेन्शन योजना लागू करणेबाबत

(७) ३०९९ (१७-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत पेन्शन योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या एकीकृत पेन्शन योजनेचे राजपत्र निर्गमित झालेले असून सुधारित पेन्शन योजनेची कार्यपध्दती काय आहे याबाबतीत कुठलेही पत्र निर्गमित झालेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी व कार्यपध्दती विशद करणारा शासन निर्णय निर्गमित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री.अजित पवार (०७-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २०/०९/२०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१/०३/२०२४ पासून लागू करण्याचा तसेच केंद्र सरकारने घोषित केलेल्या UPS (Unified Pension Scheme) शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर सुधारीत निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत सादर करावा अश्या सूचना देण्यात आल्या आहेत.
तद्नंतर, सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी द्यावयाच्या विकल्पाची मुदत शासन निर्णय दिनांक २८/०३/२०२५ अन्वये एक वर्षापर्यंत म्हणजेच दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

केंद्र शासनाने एकीकृत निवृत्तीवेतन योजना (Unified Pension Scheme) लागू करण्याची अधिसूचना निर्गमित केली असली तरी सदर योजनेमध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहभागी करण्याबाबत शासनास कोणतेही निर्देश प्राप्त झालेले नाहीत. असे निर्देश प्राप्त झाल्यानंतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) लागू करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.
सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसंदर्भात राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सदर योजनेत सहभागी होण्यासाठी विकल्प देण्यासाठी दिनांक २८/०३/२०२५ च्या शासन निणर्यान्वये दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तद्नंतर, आवश्यक कार्यवाही करून विहित कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या कामांमध्ये अनियमितता होत असल्याबाबत

(८) ३४८२ (२४-०६-२०२५) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या "रा.मा.१८९" (हॅम पॅकेज पीएन-४७) आणि "रा.मा.१७८" (हॅम पॅकेज पीएन-४८) या दोन प्रकल्पांमध्ये कंत्राटदारांनी बनावट डांबर चलनांचा वापर करून शासनाचा रुपये २५ कोटी १२ लाख ३९ हजार १२० एवढ्या रक्कमेचा अपहार केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही प्रकल्पांमध्ये एकाच चलनांचा वापर करून देयके मंजूर करण्यात आली आहेत काय, तसेच निविदा देण्यात आलेल्या मूळ कंत्राटदाराच्या नावाने एकही चलन नसून इतर संबंधित कंपन्यांची नावे वापरुन मोजमाप पुस्तिकेत डांबर वापराची नोंद करण्यात आली नसतानाही देयके मंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेची तसेच कंत्राटदाराकडून करण्यात आलेल्या कामांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोल्हापूर जिल्ह्यातील "रा.मा.१८९" (हॅम पॅकेज पीएन-४७) आणि "रा.मा.१७८" (हॅम पॅकेज पीएन-४८) या दोन रस्ते प्रकल्पांची निविदा रद्द करुन कंत्राटदारास अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करुन त्यांचा समावेश काळया यादीत करण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-०७-२०२५) : (१) निवेदन प्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

(३) निवेदन प्राप्त आहे.

(४) मुख्य अभियंता,सा.बां.प्रा.विभाग,पुणे यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेने संपुष्टात आलेल्या विकास आराखड्यातील रस्त्यांच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत

(९) ३५९८ (०३-०७-२०२५) ॲड.अनिल परब : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेने संपुष्टात आलेल्या विकास आराखड्यातील रस्त्यांचे बेकायदेशीररित्या रुंदीकरण तसेच कल्याण - डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने महाराष्ट्र

महानगपालिका एमआरटीपी च्या अधिनियम कलम २१० चा गैरवापर करुन मंजूर विकास आराखड्यात नसलेले रस्ते अधिकाराचा दुरुपयोग करुन व विकासकांचे हित लक्षात घेऊन कायदयातील तरतुदीचे उल्लंघन करुन रुंद करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडा संपुष्टात आलेला असून गत २० वर्षात विकास योजनेची कोणतीही फेरतपासणी न करता तत्कालिन सहायक संचालक नगररचना यांनी विकास आराखड्यात ९ त्रुटी दर्शवुनही सदर त्रुटींची दखल घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखडा अस्तित्वात नसताना किंवा तो तसाच पुढे चालू ठेवणेबाबत शासन आदेश नसतानाही तत्कालिन आयुक्त व कार्यरत आयुक्त यांच्या कार्यकाळात कलम २१० व २१२ अन्वये ठराव तयार करुन अनावश्यकरित्या काम करुन जनतेस वेठीस धरुन सदर कामात आर्थिक गैरव्यवहार करुन योजना अंमलात आणून विकासकाला आर्थिक फायदा करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा कण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१०-०७-२०२५) : (१) व (२) अश्या स्वरुपाच्या बाबी नमूद असलेले निवेदन माहे मे, २०२५ मध्ये शासनास प्राप्त झाले आहे. यासंदर्भात आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे.

(३) अशी वस्तुस्थिती नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ मधील तरतुदीनुसार विकास योजनेचा अंतिम भाग अमलात आल्याच्या दिनांकापासून वीस वर्षाच्या आत विकास योजना सुधारित करण्याची तरतूद आहे. सुधारित प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत मंजूर विकास योजनाचे प्रस्ताव अंमलात राहतात.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

रोहा (जि.रायगड) येथील शासकीय गोदामातील ६०० टन धान्याचे नुकसान झाल्याबाबत

(१०) ३६९० (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील २१ शासकीय धान्य गोदांमामध्ये सात हमाल संस्थांना शासनाने कंत्राट दिले असून या कंत्राटांची मुदत सन २०२२ मध्ये संपल्यानंतरही हमाल संस्थांना वेळोवेळी तात्पुरती मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहा येथील हमालांनी, प्रलंबित हमाली देयके, माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या सुधारित दरांची (खंड ३३ अंतर्गत) अंमलबजावणी करणे, मुदतवाढीऐवजी नव्याने निश्चित प्रक्रिया करणे आदी मागण्यांसाठी दिनांक १७ जानेवारी, २०२५ पासून कामबंद आंदोलन पुकारले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी कामगारांच्या संपामुळे महिनाभरापासून गोदामात पडलेले सुमारे ६०० टन धान्याचे

सडून नुकसान झाले असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (१४-०८-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) धान्य खराब झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र राज्य लॉटरी सुरु ठेवण्यासाठी शासनाने समिती नियुक्त केल्याबाबत

(११) ३७२८ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य लॉटरी सुरु ठेवायची तर तिच्यापासूनचे उत्पन्न कसे वाढविता येईल याचा अभ्यास करुन राज्य शासनाला शिफारशी करण्यासाठी माजी वित्तमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने, केरळ राज्यासह अन्य संबंधित राज्यांचा दौरा करुन त्याबाबतचा आपला अहवाल एक महिन्यात शासनास सादर करणार असल्याचेही त्याबाबतच्या आदेशात नमूद केले असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय व केव्हा, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (१८-०८-२०२५) : (१) होय,हे खरे आहे.
(२) अंशत:खरे आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने केरळ राज्य लॉटरीचा अभ्यास दौरा करण्याकरीता राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय २१ एप्रिल, २०२५ रोजीचा असून दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार सदर समितीचा अहवाल सादर करण्याबाबत एक महिन्याऐवजी तीन महिने कालावधी असा बदल करण्यात आला आहे.
(३) नाही, अद्याप सदर समितीने शासनास अहवाल सादर केलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शिधापत्रिकाधारकांना मिळणारे शासकीय फायदे मिळण्याच्या दृष्टीने ई-केवायसी या मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

(१२) ३७५२ (१७-०७-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेशनकार्डला (शिधापत्रिका) आधार क्रमांक लिंक करण्यासाठी केंद्र शासनाने ई-केवायसी मोहिम राबविली असून रेशनकार्ड धारकांनी ई-केवायसी न केल्यास रेशनकार्ड (शिधापत्रिका) रद्द करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १ कोटी ६५ लाख ३३ हजार रेशनकार्डधारकांनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी पर्यंतची मुदत संपूनही ई-केवायसी केली नसून राज्यात ई-केवायसी केलेल्या कागदपत्रांच्या छाननीनंतर सुमारे १७ लाख ९५ हजार ५५३ रेशनकार्ड विविध कारणास्तव रद्द करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील जनतेला शिधापत्रिकेमार्फत शासकीय फायदे मिळण्याच्या दृष्टीने तसेच शिधावाटप प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण व्हावी या उद्देशाने सर्व शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकेस आधारकार्ड लिंक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (१९-०९-२०२५) : (१) व (२) हे, खरे नाही.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांची ई-केवायसी मोहिम राबविण्यात आली आहे. तथापि, ई-केवायसी न केल्यास शिधापत्रिका रद्द करण्याबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही. तसेच, दिनांक ३०/०४/२०२५ च्या अहवालानुसार, राज्यात १७,९५,५५३ ऑनलाईन शिधापत्रिका रद्द केलेल्या नसून शिधापत्रिका व आधार कार्ड वरील माहितीमध्ये विसंगती असल्यामुळे सदर शिधापत्रिकांची ई-केवायसी नाकारण्यात आलेली आहे.
(३) केंद्र शासनाच्या सूचनांनुसार लाभार्थ्यांचे शिधापत्रिकांसोबत आधार संलग्न करणे व ई-केवायसी करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांना दिनांक २७/०६/२०२५ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंतोरा,जोलवाडी,देलवाडी, अंबिकापुर (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील जमीन थेट खरेदीने संपादित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

(१३) ४०१५ (०९-०७-२०२५) श्री.दादाराव केचे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंतोरा,जोलवाडी,देलवाडी, अंबिकापुर (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील रस्ता बांधकामाकरीता आवश्यक असलेल्या जमीन थेट खरेदीने संपादित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याकरीता मा.मंत्री, ग्रामविकास यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादनाच्या सुधारित प्रस्तावास जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार भूसंपादनाकरीता निधी मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) मौ.अंतोरा, जोलवाडी, देलवाडी, अंबिकापुर (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील रस्त्याच्या बांधकामाकरीता आवश्यक असलेली जमीन संबंधित शेतकऱ्यांनी/ जमीन मालकांनी सन १९९८-९९ मध्ये स्वखुशीने दिली असल्याने कागदपत्रांवरुन स्पष्ट झाले आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.६०६६/१९९५ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार व महसूल व वन विभागाच्या दिनांक २६/१०/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी शेतकऱ्यांनी स्वखुशीने जमीन दिली असल्यास, अशा जमिनीची नुकसान भरपाई काही कालावधीनंतर मागणी करण्याचा अधिकार संबंधित जमीन मालकास राहत नाही. तसेच जमीन ताब्यात घेतेवेळी रीतसर भूसंपादन प्रक्रियेच्या माध्यमातून संपादन झाले नसल्यास, जमीन मालकाच्या संमतीशिवाय घेतली नसावी व त्याने नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क सोडून दिला आहे, असे समजून कालांतराने संबंधित जमीन मालकाने नुकसान भरपाईची मागणी केल्यास अशी प्रकरणे नाकारण्यात यावीत, अशी तरतूद आहे. त्यानुसार उपरोक्त प्रकरणी भूसंपादनाचा मोबदला देता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) राबविण्यात येत असलेल्या एलिव्हेटेड रोड आणि रोड टनेल या दोन प्रकल्पांच्या निविदेबाबत

(१४) ४३८९ (२६-०६-२०२५) श्री.अंबादास दानवे: सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) राबविण्यात येत असलेल्या एलिव्हेटेड रोड (सुमारे रुपये ६,००० कोटी) आणि रोड टनेल (सुमारे रुपये ८,००० कोटी) या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत लार्सन ॲण्ड टुब्रो (एल ॲण्ड टी) सारख्या कंपनीस कोणतीही पूर्वसूचना न देता तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरविण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एल ॲण्ड टीच्या निविदा मेघा इंजिनिअरिंग ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या तुलनेत अनुक्रमे रुपये २,५२१ कोटी (टनेल प्रकल्प) आणि रुपये ६०९ कोटी (एलिव्हेटेड रोड प्रकल्प) इतकी कमी असूनही त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० मे, २०२५ रोजी झालेल्या सुनावणीत एमएमआरडीएच्या पारदर्शकतेच्या अभावावर टिप्पणी केली असून, निविदा प्रक्रिया पुन्हा राबविण्याचा संकेत दिल्यानुसार सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली, तथापि, सदर निविदा प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने राबविणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर अद्यापही कोणतीच कारवाई न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करुन चुकीच्या पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२५) : (१), (२), (३), (४) व (५) एमएमआरडीएमार्फत घोडबंदर येथील वाहतूक कोंडी विचारात घेऊन गायमुख ते भाईंदर पर्यंत भुयारी व उन्नत मार्ग उभारण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. यामध्ये गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शन असा ५.७० कि.मी. चा भुयारी मार्ग व फाऊंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर असा ९.८० कि.मी चा उन्नत मार्ग उभारण्यात येणार आहे. सदरहू मार्ग उभारण्यासाठी प्राधिकरणामार्फत २७/०७/२०२४ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. याकरीता पाच कंपन्यानी आपल्या निविदा सादर केल्या होत्या.

सदर निविदेमध्ये छाननी समितीच्या शिफारशीनुसार तीन निविदा धारकांना तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरविण्यात आले व उर्वरित दोन निविदाकारांना तांत्रिक छाननीमध्ये अपात्र ठरविण्यात आले, त्यामध्ये एल ॲण्ड टी या कंपनीचा समावेश होता.या अपात्र केल्याचे विरुध्द एल ॲण्ड टी कंपनीने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने प्राधिकरणाने एल ॲण्ड टी कंपनीस पुर्व सूचना न देता अपात्रतेबाबत केलेली कार्यवाही योग्य असल्याचा निर्णय देऊन एल ॲण्ड टी ची याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे पात्र निविदा धारकांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. त्यानुसार मेघा इंजिनिअरींग इन्फ्रास्ट्रचर लि. यांनी गायमुख ते फाऊंटन हॉटेल या भुयारी मार्गाच्या कामासाठी रुपये ९०१९.५३ कोटी व फाऊंटन हॉटेल जंक्शन ते भाईंदर या उन्नत मार्गाच्या कामासाठी रुपये ६१६३.३४ कोटी न्युनतम दराची निविदा दाखल असल्यामुळे या कंपनीची निविदा मान्य करण्यात आली.

एल ॲण्ड टी कंपनीने सदर निविदा प्रक्रियेमध्ये त्यांच्या कंपनीमार्फत दाखल केलेली निविदा ही प्राधिकरणाने मान्य केलेल्या मे. मेघा इंजिनिअरींग कंपनीपेक्षा न्युनतम दराची असल्याचे नमूद करुन मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २०/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यास अनुसरुन मा.सर्वोच्च न्यायालयात प्राधिकरणाने व्यापक जनहित विचारात घेऊन अवलंबिण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेत असून असा प्रस्ताव मा.सर्वोच्च न्यायालया समोर ठेवल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ३०/०५/२०२५रोजी आदेशाद्वारे याचिका निष्फळ ठरवून फेटाळण्यात आली आहे. आता सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता फेर निविदा प्रसिध्द करण्याचे प्राधिकरणाचे नियोजन आहे.

सीना नदीत जलपर्णीच्या वाढीमुळे निर्माण झालेल्या आपत्तीजनक परिस्थितीचे निराकरण करण्याबाबत

(१५) ४४८४ (०३-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर शहरातील सीना नदी जलपर्णीमुळे पूर्णपणे व्यापली गेल्यामुळे नदी पात्रात पाणी साचण्यास अडथळा निर्माण झाल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर शहरातील सीना नदीत जलपर्णीमुळे (water hyacinth) पाणी साचण्यास अडथळा निर्माण होऊन शहरात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जलपर्णीमुळे पावसाचे पाणी नाल्यांतून वाहून न जाता थेट शहरात साचण्याची शक्यता

निर्माण होऊन नागरिकांच्या जीवित व मालमत्तेस धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेने जलपर्णी काढण्याचे काम प्रभावीपणे करण्याकरीता तसेच अपुऱ्या यंत्रणा, तांत्रिक अडथळे किंवा मनुष्यबळाच्या अभावामुळे सफाईचे काम वेळेत पूर्ण होत नसून त्यामुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१०-०७-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक २६ मे २०२५ रोजी व त्यादरम्यान अहिल्यानगर शहर व शहरालगतच्या ग्रामीण भागातील पाणलोट क्षेत्रामध्ये कमी वेळामध्ये मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे सीना नदीस पूर येऊन पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाहत येऊन सीना नदीच्या पात्रातील कमी उंचीच्या पुलास (C-D work) अडली जाऊन, त्या ठिकाणी नदीपात्राची रुंदी मोठी असल्यामुळे तेथे जलपर्णी एकत्रित गोळा झाली.

या परिस्थितीत मनपाने यंत्रसामुग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून जलपर्णी हटवून नदीचा प्रवाह खुला करण्यात आला. तसेच आपत्कालीन व्यवस्थापना अंतर्गत मनपाने पावसाळ्यापूर्वी शहर व उपनगरातील ओढे, नाले, नदीपात्राची साफसफाई करून अडथळे हटवून नैसर्गिक प्रवाह खुले करण्यात आले. त्यामुळे शहर व नदीच्या परिसरामध्ये पूर परिस्थिती निर्माण झालेली नसून कोणतीही जीवित व वित्त हानी झालेली नाही.
(५) निरंक

अहिल्यानगर जिल्ह्यातील म्हाळुंगी नदीवरील वाहून गेलेल्या पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

(१६) ४४८५ (२६-०६-२०२५) श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील म्हाळुंगी नदीवरील पूल सन २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे वाहून गेल्यानंतर दोन वर्षे उलटूनही या पुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू राहिल्यामुळे परिसरातील नागरिकांना वाहतूक, आरोग्य व दळणवळणाच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे डिझाईनसह इतर कामात तांत्रिक दोष आढळून आल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, रुग्ण, व्यावसायिक आणि नागरिकांचा वेळ, श्रम व इंधनाचा नाश होऊन आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन म्हाळुंगी नदीवरील पूल तातडीने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) : (१) संगमनेर नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया राबवून दिनांक २५/०१/२०२४ रोजी कार्यादेश दिलेला असून सदर कामाची मुदत दिनांक २४/०१/२०२५ पर्यंत होती.

परंतु काम सुरु केल्यानंतर म्हाळुंगी नदीच्या पाण्याच्या प्रवाहामुळे कामास विलंब लागत असल्याने कार्यान्वयन यंत्रणेने सदर कामास दिनांक १५/०६/२०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती.
(२) सदर पुलाच्या डिझाईनला मुख्य अभियंता (संकल्पचित्र), सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून मंजुरी घेण्यात आलेली असून त्या डिझाईननुसार नगरपरिषदेने काम पूर्ण झाले असल्याचे कळविले आहे.
(३) दिनांक १५/०६/२०२५ पासून सदरचा पुल नागरीकांना वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याबाबत

(१७) ४४८७ (३०-०६-२०२५) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यात स्वावलंबी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना' कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध यंत्रणांनी महसूल विभागाच्या निर्देशानुसार सादर केलेल्या खर्चाच्या देयकांमध्ये अनियमितता असल्याबाबत तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी प्राथमिक छाननीत नोंदवल्याची माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंत्यांनी देयकांना मंजुरी मिळावी यासाठी देयके पुन्हा प्रक्रियेत आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले असून लेखा यंत्रणेकडून यासंबंधी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द यापूर्वीही निविदा प्रक्रियेमध्ये निवडक कंत्राटदारांना अनुचित लाभ देणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे कंत्राटे मंजूर करणे तसेच अंदाजपत्रकामध्ये रुपये १० कोटींच्या मागणीत अनियमितता करणे यासारख्या तक्रारी असूनही, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधांमुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न करता दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वर्धा जिल्ह्यात स्वावलंबी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मैदानावर झालेल्या कार्यक्रमाची बनावट व जास्त दर आकरणी करून देयके सादर करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-०७-२०२५) : (१) हे खरे नसल्याचे जिल्हाधिकारी, वर्धा यांनी कळविले आहे.
(२) हे खरे नाही.
अशी कोणतीही तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आली नाही व त्याबाबत कोणतेही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली नाही.
(३) हे खरे नाही.
अशी कोणतीही तक्रार क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

यशवंतराव चव्हाण ग्रंथ निर्मिती व अनुवाद मंडळाची स्थापना करण्याबाबत

(१८) ४६२६ (१२-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण ग्रंथ निर्मिती व अनुवाद मंडळाची स्थापना करण्यात येत असल्याची घोषणा मा.मंत्री, मराठी भाषा यांनी माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यासुमारास केली असून या मंडळाच्या स्थापनेमुळे मराठी भाषेत अधिक ग्रंथ निर्मिती होईल तसेच इतर भाषांतील महत्त्वाचे साहित्य मराठीत अनुवादित होण्यास उपयुक्त होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामंडळासाठी मराठी भाषा विभागामार्फत कोणता आकृतिबंध तयार करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२९-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी" स्थापन करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत

(१९) १५२९६ (२९-१२-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर पात्र ठरलेल्या ६६ उमेदवारांच्या नियुक्त्या अद्यापही करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मंत्रालयातील नगरविकास विभागांच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत महानगरपालिकेतील मानधनावरील कर्मचारी टप्प्याटप्प्याने कमी करुन त्या जागेवर अनुकंपा तत्वावर कर्मचाऱ्यांना घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक १३/०२/२०२३ रोजी अकोला महानगरपालिकेचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून गट-क साठी १६१ पदे मंजूर आहेत त्यापैकी ८८ कर्मचारी कार्यरत असून सरळसेवेने रिक्त पदे ७५ आहेत. गट-ड साठी ५२ पदे मंजूर असून सरळसेवेने ५२ पदावर कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे गट-ड

पदाकरीता वर्ग-४ ची पदे अकोला महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अनुकंपा नियुक्तीकरीता उपलब्ध नाहीत. अकोला महानगरपालिकेद्वारे सेवा प्रवेश नियमास मंजुरी मिळाल्यानंतर सरळसेवेची पदे व पदोन्नतीची पदे याबाबत मागासवर्गीय कक्ष, अमरावती विभाग यांचेकडून बिंदुनामावली तपासणी करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येईल. मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांचेकडून बिंदुनामावलीस मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सरळसेवेने अनुकंपा भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यात उद्योगांना अर्थसहाय्य देऊन चालना देण्याबाबत

(२०) २३६५६ (२०-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्याची निर्मिती होऊन जवळपास २४ वर्षे झाली असून अद्यापपर्यंत पाच साखर कारखाने व अंदाजे ६ हजार सुक्ष्म व लघु उद्योग वगळता जिल्ह्यात प्रशासकीय यंत्रणेसह प्रामुख्याने बँकांच्या उदासिनतेमुळे एकही उद्योग उभा राहू शकला नसून जिल्ह्याची ‘ना उद्योग’ म्हणून ओळख कायम असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील उद्योगधंदयाच्या समस्यासाठी हिंगोली जिल्हा इंडस्ट्रीज असोसिएशन मागील अनेक वर्ष पाठपुरावा करीत असून उद्योगवाढीसाठी उद्योगांना अर्थसहाय्य व चालना देणेबाबत जिल्हा उद्योग केंद्रातून मंजूरीसाठी पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२९-१०-२०२५) : (१) राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे या कारणास्तव राज्यामध्ये सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. प्रचलित सा.प्रो.यो.२०१९ ही दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयाने जाहीर करण्यात आली आहे. सदर योजनेच्या करण्यात आलेल्या तालुका वर्गीकरणानुसार ड, ड+, नक्षलग्रस्त जिल्हे,विना उद्योग जिल्हे व आकांक्षित जिल्हे वर्गवारी असलेल्या तालुक्यातील उद्योगांना अ,ब,क वर्गीकरण असलेल्या तालुक्यापेक्षा जास्तीच्या सवलती देण्यात येत असल्यामुळे औद्योगिकदृष्टया अविकसित व ग्रामिण भागात उद्योग स्थापित होण्यास चालना मिळाली आहे.

सप्रोयो-२०१९ अंतर्गत हिंगोली जिल्हा हा “ना उद्योग” या वर्गीकृत क्षेत्रात समाविष्ट आहे. त्यामुळे अ,ब,क,ड,ड+ या तुलनेने प्रगत वर्गीकृत क्षेत्रापेक्षा हिंगोली जिल्ह्यात स्थापित होणाऱ्या उद्योगांना जास्तीच्या सवलती अनुज्ञेय आहे. त्यामध्ये १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, ७ ते १५ वर्षापर्यंत विद्युत शुल्क माफी सवलत व १०० टक्के राज्य वस्तु व सेवा कराचा परतावा तसेच पात्र गुंतवणूकीच्या ११० टक्के या प्रमाणात प्रोत्साहन अनुज्ञेय आहे.

हिंगोली जिल्ह्यात फेब्रुवारी, २०२५ अखेर, ८०६४ सूक्ष्म व लघु उद्योग नोंदणीकृत असून त्यामध्ये सूक्ष्म उद्योग- ७२७३, लघु उद्योग-७७० व मध्यम उद्योग- २१ याचा समावेश आहे, तसेच जिल्ह्यामध्ये ५ मोठे साखर कारखाने कार्यरत असून, त्याद्वारे ३०५९७ रोजगार निर्मिती झालेली आहे. जिल्ह्यात एकूण ४ औद्योगिक सामाईक सुविधा केंद्रे मंजूर झालेली आहेत. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

योजनेंतर्गत मागील तीन वर्षात ६२४ प्रकरणे मंजूर झाली असून त्याद्वारे ३१२० रोजगार निर्मिती झालेली आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये एकूण ३ औद्योगिक क्षेत्र विकसित असून त्यामध्ये १०० उद्योग स्थापित आहेत.

(२) जिल्ह्यात हळदीचे एकूण ३०० प्राथमिक उद्योग असून २५ हळद पावडर तयार करणारे उद्योग घटक अस्तीत्वात आहेत. जिल्ह्यातून युएई, बांगलादेश, मलेशिया, चीन, श्रीलंका या देशात हळदीची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते. त्याच बरोबर ऊस, गूळ इत्यांदीची देखील निर्यात केली जाते. त्यामुळे राज्याच्या तसेच देशाच्या निर्यातीत जिल्ह्याचे मोठे योगदान आहे.

जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर हळद, साखर, निर्यात होत असल्यामुळे वसमत येथे ड्रायपोर्ट उभारण्याबाबत मा.उच्चाधिकार समितीची मंजूरी प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाच्या रस्ते व वाहतूक मंत्रालयाची मान्यता घेणेबाबत मुख्यालयीन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदर ड्रायपोर्ट जिल्ह्यात कार्यान्वित झाल्यास मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातून निर्यात वाढेल व त्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात उद्योग वाढीस लागतील.

जिल्ह्यात गुंतवणूकदाराची एकूण संख्या २४ असून त्यांची रुपये ४०० कोटी गुंतवणूक प्रस्तावित आहे. तसेच माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात गुंतवणूकदारांच्या बैठकीचे आयोजन केले असून त्यामध्ये आणखी नवीन गुंतवणुकदारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.जिल्ह्यातील गुंतवणूकदारांना त्यांच्या उद्योग वाढीसाठी व गुंतवणूकीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून सर्वतोपरी सहाय्य करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ.विलास आठवले
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.